# ऋणनिर्देश

पंखात नुकतेच बळ आलेल्या चिमुकल्या पाखरासारखे स्वैर आणि स्वच्छंदी जीवन जगताना आणि विश्वरूपी अवकाशात भरारी घेत असताना, मर्यादेच्या सीमारेषा कधीच न उल्लंघता अपेक्षित ध्येय, ध्येयपूर्तीसाठी केलेले मार्गपरिक्रमण, ध्येयमार्गात आलेल्या अनंत अडचणी आणि या सर्व संघर्षातून साकारलेला 'गौरवग्रंथांचा विवेचक अभ्यास' (गंगाधर पानतावणे व रत्नाकर मंचरकर यांच्यावरील गौरवग्रंथाधारे) हा लघु-शोध प्रबंध पूर्ण झाल्याचा आनंद अवर्णनीय आहे. या संशोधन कार्यास सहाय्य करणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे आभार ! कदाचित या सर्वांसाठी 'आभार' हा शब्द काहीसा अप्रस्तुत वाटतो, म्हणूनच या सर्वांच्या ऋणात राहण्यातच अधिक धन्यता वाटते.

एक वाचक म्हणून मराठी वाङ्मयाची गोडी फार पूर्वीपासूनच होती. परंतु महाविद्यालयीन जीवनात हा अभ्यासाचा विषय झाल्यामुळेच सर्वसामान्य वाचकाचे रूपांतर चोखंदळ रसिकामध्ये घडून आले. आस्वादाचा मनमुराद आनंद नव-नवीन क्षितिजे खुणावत गेला. मनातील जिज्ञासू प्रवृत्तीचा हा अश्व दाहीदिशांना उधळला गेला. चिंतन आणि मनन या दोन्ही गोष्टींमधूनच समीक्षा क्षेत्राची विशेष आवड निर्माण झालेली आहे. ही आवड लक्षात घेऊनच प्रस्तुत संशोधन प्रकल्प साकारलेला आहे.

मराठी वाङ्मयामध्ये गौरवग्रंथांची दीर्घ परंपरा असल्याचे दिसून येत नाही. परंतु साठोत्तरी कालखंडामध्ये लक्षणीय ग्रंथप्रकार म्हणून गौरवग्रंथ दिसून येतो. या ग्रंथांमध्ये गौरवमूर्तींच्या व्यक्तिगत जीवन आणि त्याचबरोबर त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा आलेख दर्शविलेला असतो. अनेकप्रसंगी संशोधनासाठी ग्रंथकाराच्या चरित्राची माहिती असणे आवश्यक असते. त्यामुळे अशा प्रकारच्या गौरवग्रंथांमधून व्यक्तिशोध घेण्याचा प्रयत्न केलेला असतो. एक माणूस आणि कलावंत या दोन्ही पातळ्यांवरचे जीवनदर्शन यातून दिसून येते.

मराठी वाङ्मयामध्ये अशा स्वरूपाच्या गौरवग्रंथांचा संशोधनविषय म्हणून स्वतंत्र विचार झालेला दिसून येत नाही. मराठी वाङ्मयामध्ये समीक्षादृष्ट्या शिस्तबद्ध अभ्यासाची जी परंपरा निर्माण झालेली आहे त्याचाच शोध घेतला गेलेला आहे.

अशा दुर्लक्षित अभ्यासक्षेत्राकडे लक्ष वेधल्याबद्दल आणि संशोधनास प्रोत्साहित केल्याबद्दल सर्वप्रथम मी माझे संशोधक मार्गदर्शक [illegible]. डॉ. शिवाजी विष्णू पाटील यांची अत्यंत ऋणी आहे. केवळ त्यांच्या मार्गदर्शन आणि प्रोत्साहनामुळे हा संकल्प सिद्धीस गेलेला आहे. याचबरोबर प्रस्तुत संशोधनाविषयी झालेल्या चर्चा आणि त्यातूनच मिळालेले मार्गदर्शन या बद्दल डॉ. सौ. नलिनी महाडीक, (मराठी विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा), डॉ. सौ. शुभांगी भुतकर, सौ. मानसी लाटकर आणि डॉ. सौ.अर्चना चव्हाण यांचीही अत्यंत आभारी आहे.

संशोधनासाठी उपयुक्त संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिल्याबद्दल बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हपूर तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील ग्रंथपालांची मी अत्यंत आभारी आहे.

याचबरोबर ज्यांच्या प्रेरणेमुळे आणि अथक परिश्रमामुळे संशोधन कार्य सिद्धीस गेले ते माझे कुटुंबीय आई-अण्णा, आजी, दोन्ही भाऊ हणमंत, सागर यांचीही मी अत्यंत ऋणी आहे. त्यांच्या प्रेरणेमुळेच व प्रबळ प्रोत्साहनामुळे हे कार्य शक्य झालेले आहे.

संशोधन प्रकल्पाचे कॉम्प्युटर टायपिंग करून देणारे तसेच संशोधनाला उत्कृष्ट व नेटकी बांधणी करून देणारे मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री. मुकुंद ढवळे व राजू कुलकर्णी यांची मी आभारी आहे.

शेवटी संशोधनास सहाय्य करणाऱ्या सर्व ज्ञात -अज्ञात व्यक्तींचे पुनश्च आभार !

वि. वि. नावडकर

(कु. विद्या विजय नावडकर)